नि.फौ.मा.क. ७३/२०२३
सरकार -वि-संजय
**न्यायनिर्णय नि.क.४१**

दाखल तारीख ११/०८/२०२३
नोंदणी तारीख ११/०८/२०२३
निकाल तारीख २७/०७/२०२६
कालावधी ०२वर्षे,११म.,१६दि.

**भाग अ**
**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**
**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क. ४४ (१)}**

| | |
|---|---|
| | **निशाणी क.४१** |
| **कोर्ट विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, चामोर्शी यांचे न्यायालय**<br>पिठासीन अधिकारी :- योगेश्वर ज. वळवी | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क.४९/२०२३<br>आष्टी पोलिस ठाणे |
| न्यायनिर्णयाची तारीख | २७/०७/२०२६ |
| प्रकरण क्रमांक | नियमित फौजदारी खटला क्रमांक ७३/२०२३ |
| | CNR No.**MHGA090007912023** |
| तक्रारकर्ता /अभियोग | महाराष्ट् शासन<br>मार्फत पोलिस ठाणे अधिकारी, पोलिस ठाणे आष्टी |
| प्रतिनिधीत्व करणार | **श्री. एस.एम.सलामे**<br>(सहायक सरकारी वकील) |
| आरोपी | संजय श्रीपती सोयाम,<br>वय-३८ वर्ष, धंदा-मजुरी,<br>रा. सोमनपल्ली, तह-चामोर्शी,<br>जिल्हा-गडचिरोली. |
| प्रतिनिधीत्व करणार | **श्री.आर.एन.ठाकरे**<br>(आरोपीतर्फे वकील) |

**भाग ब**
**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क. ४४ (२)}**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २७/०२/२०२३ ते ०५/०३/२०२३ |
| पहिल्या खबरीची तारीख | ०५/०३/२०२३ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | ११/०८/२०२३ |
| दोषरोपनिश्चीती तारीख | २५/०९/२०२५ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | १७/१०/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | २७/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | २७/०७/२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | -- |

## आरोपीबाबत तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिध्द की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संजय श्रीपती सोयाम | १८/०४/२०२३<br><br>३१/०१/२०२४<br><br>२५/०९/२०२५ | १८/०४/२०२३<br><br>१६/०४/२०२४<br><br>....... | भा.द.वि. चे कलम ४२९ व २०१ अन्वये | निर्दोष मुक्त | लागु नाही | लागु नाही |

| या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ | **फौजदारी संहिता** |
| भारतीय दंड विधान, १८६० | **दंड विधान** |
| भारतीय पुरावा अधिनियम, १९७२ | **पुरावा अधिनियम** |

**भाग क**

**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क. ४४ (३)}**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षदारांची यादी**

**अ. फियार्दी पक्ष :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क. १ | सुरेश मोतीराम मेश्राम | फिर्यादी |
| सा.कं. २ | मुर्लीधर लहानु ठाकरे | साक्षदार |
| सा.कं. ३ | केशव गणेश पेददीवार | पंच |
| सा.कं. ४ | सचिन विष्णु ढालकरी | वैदयकीय अधिकारी |
| सा.कं. ५ | प्रविण अरुण सुरवाडे | दाखल अमलदार |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने निशाणीबध्द दस्तांची यादी**

**ब. बचाव साक्षीदार, असल्यास :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा स्वरूप |
|---|---|---|
| | --निरंक-- | |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा स्वरूप |
|---|---|---|
| | --निरंक-- | |

## सरकारपक्ष/बचाव/न्यायालयीन निशाणींची यादी

**अ. सरकारपक्ष :**

| अ.क्रमांक | निशानी कंमाक | विवरण |
|---|---|---|
| १ | निशाणी/**पी-२६**/सा.क्र.१ | तक्रार |
| २ | निशाणी/**पी-२७**/सा.क्र.१ | एफ.आय.आर. |
| ३ | निशाणी/**पी-२८**/सा.क्र.१ | घटनास्थळ पंचनामा |
| ४ | निशाणी/**पी-३४**/सा.क्र.३ | सुचनापत्र |
| ५ | निशाणी/**पी-३६**/सा.क्र.४ | पत्र |
| ६ | निशाणी/**पी-३७ व ३८**/सा.क्र.४ | शवविच्छेदन अहवाल |
| ७ | निशाणी/**पी-४०**/सा.क्र.५ | अटक फार्म |

**ब. बचावपक्ष :**

| अ.क्रमांक | निशानी कंमाक | विवरण |
|---|---|---|
| | --निरंक-- | |

**क. न्यायालयीन निशाणी :**

| अ.क्रमांक | निशानी कंमाक | विवरण |
|---|---|---|
| | **--निरंक--** | |

**ड. महत्वाच्या वस्तु :**

| अ.क्र. | निशानी कंमाक | विवरण |
|---|---|---|
| १ | वस्तुचिन्ह अ | अटक फार्मवरील छायाचित्र |
| २ | वस्तुचिन्ह अ -१ ते अ-२ | फोटो |

## न्यायनिर्णय

(आज दिनांक २७ जुलै २०२६ रोजी घोषीत)

१. आरोपीवर भारतीय दंड संहितेचे कलम ४२९ व २०१ अन्वये आरोप ठेवुन खटला चालविण्यात आला.

२. अभियोग पक्षाचे कथन संक्षिप्त रुपात खालीलप्रमाणे आहे :

अ) फिर्यादी सुरेश मोतीराम मेश्राम यांनी दि. ०५.०३.२०२३ रोजी आष्टी पोलिस स्टेशनला खबर दिली की, त्याच्याकडे एक म्हैस अंदाजे ७ वर्षाची व तिचा बछडा रेडा वय अंदजे ०२ वर्षे असे जनावरे आहे. त्याच्या गावातील सर्व शेतक-यांचे शेतातील पिकांची काढणी झालेली असल्याने गावातील सर्व शेतकरी व ते आपले जनावरे काढणी झालेल्या शेतात चरण्यासाठी मोकळी सोडत असतात. दि. २७.०२.२०२३ रोजी

सोमवारी सकाळी ०८:०० वाजताचे सुमारास त्याने त्याची म्हैस व तिच्या बछडयास तसेच तिच्या घरा जवळ राहणारे ऋषीदेव शंकर चटारे यांनी सुध्दा त्यांच्या ०२ म्हशी त्याच्या जनावरांसोबत गावालगतच्या मोकळया शेतात चरण्याकरीता सोडल्या. परंतु संध्याकाळी त्याच्या म्हशीचा बछडा रेडा हा एकटाच घरी आला. तेव्हा त्याने ऋषीदेव शंकर चटारे यांचे घरी जावुन 'तुमच्या म्हशी घरी आल्या का' असे विचारले असता त्याने माझी एक म्हैस घरी आली नाही असे सांगितले. परंतु सकाळ होवुनही त्याची म्हैस व ऋषीदेव शंकर चटारे यांची ०१ म्हैस ही घरी परत न आल्याने त्यांनी गावात तसेच शेतशिवारात आजुबाजुला त्यांच्या जनावराचा शोध घेतला असता दि. ०५.०३.२०२३ रोजी सकाळी ०९:०० वाजताच्या सुमारास कालीदास तावाडे राहणार वायगांव यांचे शेतातील विहीरीत ऋषीदेव शंकर चटारे यांची म्हैस मृतावस्थेत पाण्यावर तरंगत असल्याचे दिसुन आले तसेच त्याच्या म्हशीचे मुंडके व एक पाय पाण्यावर तरंगत असताना दिसुन आले. तसेच त्यांनी पुढे कथन केले की, कोणीतरी अज्ञात इसमाने शेतात चरण्यासाठी गेलेल्या त्याच्या व ऋषीदेव शंकर चटारे यांचे म्हशींना दि. २७.०२.२०२३ रोजीचे सकाळी ०८:०० वाजता ते दि. ०५.०३.२०२३ चे ०९:०० वाजताचे दरम्यान जिवानीशी मारुन पुरावा नष्ट करण्याच्या उददेशाने विहीरीत टाकले आहे.

३. सदर तोंडी रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन, आष्टी येथे भा.द.वी कलम ४२९ व २०१ नुसार अपराध क्र.४९/२०२३ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. चामोर्शी पोलीस स्टेशनचे पोलिस हवालदार शामराव मडावी यांनी सदर गुन्हयाचा तपास केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला व आरोपीला अटक केली. त्यानंतर साक्षदाराचे बयान नोंदविले व दस्ताऐवज हस्तगत केले. त्यानंतर तपासाअंती आरोपीविरुध्द पुरावा मिळुन आल्याने भारतीय दंड संहितेचे कलम ४२९ व २०१ अन्वये दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. आरोपीविरूध्द भा.द.वी. कलम ४२९ व २०१ अंतर्गत दोषारोप नि.कं.२१ वर निश्चित केले. सदर दोषारोप आरोपीला त्याच्या भाषेत समजावुन सांगितले असता त्याने त्याच्यावर केलेले आरोप नाकारले व खटल्याला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. फौ.प्र.सं.कलम ३१३ अन्वये आरोपीचे निवेदन नि.क्र. ४० वर नोंदविण्यात आले, त्यात खोटी केस केल्याचा बचाव आरोपीने घेतला आहे.

५. फिर्यादी पक्षाची हकीकत, अभिलेखावर आलेला तोंडी व लेखी

पुरावा यावरुन निराकरणासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणासह खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | दिनांक २७/०२/२०२३ रोजी सकाळी ०८.०० ते ०९:०० वाजताच्या सुमारास सोमनपल्ली, तह. चामोर्शी, जि. गडचिरोली येथे आरोपीने वन्यप्राण्यांचा शिकार करण्याकरीता विदयुत करंट लावलेले तारामध्ये फिर्यादीच्या म्हशींना विदयुत प्रवाह लागुन त्यामध्ये दोन म्हशी मरण्यास कारणीभुत झाले आणि त्याद्वारे आरोपीने भादवी कलम ४२९ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी |
| २ | वरील दिवशी वेळी व ठिकाणी आरोपीने दोन म्हशी जिवानिशी ठार मारुन पुरावा नष्ट करण्याच्या उददेशाने विहीरीत टाकले आणि त्याद्वारे आरोपीने भादवी कलम २०१ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी |
| ३ | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

६. सरकार पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस.एम.सलामे व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री आर.एन.ठाकरे यांचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्र.१ ते ३ बाबत** :-

अभियोग पक्षाने आरोपीवरील दोषारोप शाबीत करण्यासाठी ०५ साक्षदार तपासले आहे व मुददा क्र. १ ते ३ याबाबत एकच पुरावा असल्याने त्यांची चर्चा एकत्रित केली आहे.

७. साक्षदार क्रं. १ फिर्यादी सुरेश मोतीराम मेश्राम याने त्याच्या साक्षमध्ये कथन केले की, तो फेब्रुवारी, २०२३ मध्ये शेतीचा व्यवसाय करता होता. त्याच्याकडे शेती कामासाठी बैल व म्हैस होती. तो त्यांना चारण्यासाठी शेतात नेत होता. दि. २७.०२.२०२३ त्याची म्हैस गाभन होती. त्याने त्याची म्हैस चरण्यासाठी मोकळी सोडलेली होती. त्याच्या गावातील संजय सोयाम हा जंगली जनावरांना शॉक लावण्यासाठी करंट

सोडत होता. सायंकाळी त्याची म्हैस व ऋषिकेश चटारे याची म्हैस करंट लागुन जगन सरोवर यांच्या शेतावर मरण पावले. त्यांना त्या दिवशी म्हशी मिळुन आल्या नाही त्यामुळे त्यांनी चौकशी केली. त्यानंतर त्यातील एक म्हैस कालीदास तावाडे याच्या विहीरीत टाकलेली होती व त्याची म्हैसचे तुकडे केलेले होते. त्यानंतर ते पोलिस स्टेशनला तक्रार दयायला गेले. सदर साक्षदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, पोलिस घटनास्थळी आले होते. पोलिसांना घटनास्थळाबाबत त्यांनी सांगितले. त्यानुसार पंचनामा करण्यात आला.

८. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान त्याने मान्य केले की, त्याने आरोपीला प्रत्यक्षात तार लावतांना पाहिले नाही. त्याने मान्य केले की, त्याने आरोपीला म्हैस विहिरीमध्ये टाकतांना व म्हैसचे तुकडे करतांना प्रत्यक्ष पाहिले नाही. त्याने मान्य केले की, ज्या शेताच्या विहिरीत म्हैस टाकली त्या शेताचा सर्व्हे क्रमांक त्याला माहित नाही. त्याने मान्य केले की, तो आरोपीचा जातीचा नाही. त्याने सांगितले की, त्याने १२ वी शिक्षण घेतले आहे. सदर साक्षदाराने बचावाच्या सुचना नाकारल्या आहे.

९. साक्षदार क्रं. २ मुर्लीधर लहानु ठाकरे याने त्याच्या साक्षमध्ये कथन केले की, तो, रुषीदेव चटारे व सुरेश मेश्राम यांना ओळखतो, ते त्याच्या गावातील आहे. तो संजय सोयाम याला ओळखतो व तो त्याच्या गावातील आहे. तो मोल मजुरीचे काम करतो. त्याची थोडी शेती आहे. त्याची शेती सोमनपल्ली येथे आहे. संजय सोयाम याची शेती त्याच्या शेताजवळ नाही. दि. ०५.०३.२०२३ रोजी त्याचे समक्ष काही घटना घडली नाही. त्याला कोणीही माहिती दिली नाही. त्याने पोलिसांना जबाब दिला नाही. सदर साक्षदाराने अभियोग पक्षाला सहाय्य न केल्याने अभियोग पक्षातर्फे त्याला फितुर घोषीत करुन सुचक प्रश्न विचारण्यात आले परंतु, त्याला विचारण्यात आलेल्या सुचक प्रश्नांना त्याने नकारार्थी उत्तर दिले. त्यामुळे अभियोग पक्षाच्या बाजुने कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

१०. साक्षदार क्रं. ३ केशव गणेश पेददीवार याने त्याच्या साक्षमध्ये कथन केले की, तो रुषीदेव चटारे व सुरेश मेश्राम यांना ओळखतो. ते त्याच्या गावातील आहे. तो संजय सोयाम याला ओळखतो व तो त्याच्या गावातील आहे. दि. ०५.०३.२०२३ रोजी तावाडे यांच्या शेतात कोणीतरी म्हशी मारुन टाकलेल्या होत्या. त्याचा पंचनामा

पोलिसांनी करण्यासाठी त्यांना पंच म्हणुन बोलावले. त्या म्हशींना वीज लावुन मारलेले होते. तेथे तार काढुन होते. त्यावेळी दुसरा पंच विकास नैताम हा होता. तेथे विहीरीत म्हशी पाण्यात मृत अवस्थेत तरंगत होते. पंचनामा सायंकाळच्या ०६:०० ते ०६:३० च्या सुमारास करण्यात आला. त्यानंतर घटनास्थळ पंचनामा करतेवेळी फोटो काढले होते. त्याला दाखविण्यात आलेले वस्तुचिन्ह अ-१ ते अ-२ वरील फोटो तेच असल्याचे सांगितले.

११. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान त्याने मान्य केले की, ते ज्या शेतावर गेले त्या शेताचा भुमापन क्रमांक त्याला सांगता येणार नाही व त्याला त्या शेताचा चारही बाजुच्या चर्तुसिमा सांगता येणार नाही. त्याने मान्य केले की, त्या म्हशी निश्चित वीज लागुन मरण पावले किंवा कसे हे त्याला सांगता येणार नाही. त्याने मान्य केले की, ती विहीर कोणाच्या नावाने आहे हे त्याला माहित नाही. त्याने मान्य केले की, फिर्यादीशी त्याचे सबंध चांगले आहे. सदर साक्षदाराने बचावाच्या सुचना नाकारले आहे.

१२. साक्षदार कं. ४ पशु वैदयकीय अधिकारी सचिन विष्णु ढालकरी यांनी त्यांच्या साक्षमध्ये कथन केले की, दि.०६.०३.२०२३ रोजी पंचायत समितीच्या अंतर्गत ते पशु वैदयकीय अधिकारी म्हणुन कार्यरत होते. दि. ०६.०३.२०२३ रोजी त्यांना सोमनपल्ली गावात बोलाविले होते. त्यानंतर ते सोमनपल्ली येथे शेतात गेले होते. साक्षदाराने सांगितले की, दस्ताऐवजाचे अवलोकन केल्यानंतर ते वायगाव येथील कालीदास तावाडे यांचे शेतात गेले होते. त्यांनी नि.क्र. ३६ नुसार दिलेले पत्र त्यांना दाखविण्यात आले. त्यावर त्यांची सही असुन त्यातील मजकुर खराव बरोबर असल्याचे सांगितले. त्या विहीरीत दोन म्हशी मृतावस्थेत होते व त्यांनी शवविच्छेदन अहवाल तयार केले. ते तीन चार दिवसाअगोदर मरण पावले. त्यांनी शवविच्छेदन सकाळी ०९:३० ते ११:०० वाजता आणि सकाळी ११:३० ते दुपारी ०१:२५ वाजता पुर्ण केले. मृत्युचे कारण हे अतिउच्च प्रवाह विदयुत होते. त्यानंतर त्यांनी शवविच्छेदन अहवाल जारी केला. त्यांना दाखविण्यात आलेले नि.क्र. ३७ व ३८ वरील शवविच्छेदन अहवालावर त्यांची सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले.

१३. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान त्यांनी सांगितले की, शवविच्छेदनाकरीता जाण्यासाठी त्यांनी वरिष्ठ कार्यालयातुन परवानगी घेतली नव्हती.

सदर साक्षदाराने खोटे अहवाल दिल्याची सुचना नाकारली आहे.

१४. साक्षदार क्रं. ५ दाखल अमलदार प्रविण अरुण सुरवाडे यांनी त्यांच्या साक्षमध्ये कथन केले की, शामराव मडावी यांना ते ओळखतात त्यांनी त्यांच्यासोबत दोन वर्ष पोलिस खात्यात काम केले आहे. त्यांना कर्करोग झाला आहे. अपराध क्रमांक ४९/२०२३ चा तपास चालु असताना ते, शामराव मडावी यांच्यासोबत पंचनाम्याच्या वेळी हजर होते. ते, शामराव मडावी यांची सही ओळखु शकतात. त्यांना दाखविण्यात आलेल्या नि.क्र.३४ वरील सुचनापत्रावर शामराव मडावी यांची सही असल्याचे सांगितले. त्यांना दाखविण्यात आलेल्या नि.क्र.२८ वरील पंचनाम्यावर शामराव मडावी यांची सही असल्याचे सांगितले. पंचनामा लिहीण्यात आला त्यावेळी ते हजर होते. पंचनाम्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. त्यांना दाखविण्यात आलेले नि.क्रं.४० वरील अटक फार्मवर शामराव मडावी यांची सही आहे व ती ते ओळखतात आणि त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. त्यांनी तोंडी रिपोर्ट लिहुन घेतला होता. तो त्यांनी फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे लिहुन घेतला होता. त्यांना दाखविण्यात आलेला नि.क्र. २६ वरील तोंडी रिपोर्ट तोच असुन त्यावर त्याची सही आहे आणि त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले.

१५. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान त्यांनी सांगितले की, ते ज्या मोटार सायकलने पंचनाम्याच्या ठिकाणी गेले, त्या मोटार सायकलचा क्रमांक एम एच १९ सी के. ५९०६ असा होता व ती त्यांची होती. त्यांनी सांगितले की, दुस-या मोटार सायकलचा क्रमांक त्यांना सांगता येणार नाही. त्यांनी सांगितले की, ते मोटार सायकलने गेले असे दर्शविणारे पत्र अभिलेखात दाखल नाही. त्यांनी सांगितले की, ते ज्या ठिकाणी पंचनाम्याला गेले, ते ठिकाण गावाच्या बाहेर शेतातील विहीरीजवळ होते. त्यांनी सांगितले की, त्या शेताचा भुमापन क्रमांक त्यांना सांगता येणार नाही व त्या शेताच्या लगतच्या चर्तुसिमेचे भुमापन क्रमांक सांगता येणार नाही. सदर साक्षदाराने खोटी साक्ष दिल्याची सुचना नाकारली आहे.

१६. सरकारी वकीलांनी युक्तीवाद केला की, साक्षदारांनी विश्वसनीय पुरावा दिला आहे. साक्षदारांच्या पुराव्यावरुन आरोपीचा गुन्हा संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत होतो. आरोपीला दोषी धरुन शिक्षा करण्याची विनंती केली.

१७. आरोपीतर्फे श्री. आर.एन.ठाकरे यांनी युक्तीवाद केला की, अभिलेखावरील पुरावा प्रत्यक्ष स्वरुपाचा नाही. आरोपीने कथीत गुन्हा केला हे शाबीत करण्यासाठी अभिलेखावर ठोस पुरावा नाही. आरोपीवरील दोषारोप संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत होत नाही. म्हणुन आरोपीला निर्दोषमुक्त करण्याची विनंती केली.

१८. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील तोंडी व कागदोपत्री पुरावा विचारात घेतला. साक्षदार क्र. १ याने त्याच्या पुराव्यात कथन केले आहे की, आरोपी हा जंगली जनावरांना शॉक लावण्यासाठी करंट सोडत होता. परंतु सदर कथन त्याच्या खबरमध्ये नमुद नाही व त्याबाबत प्रत्यक्षदर्शी पुरावा नाही. साक्षदार क्र. १चा पुरावा ऐकीव माहितीच्या आधारावर दिलेला दिसतो. साक्षदार क्र. २ याने देखील त्याचे समक्ष घटना घडली नसल्याचे कथन केले आहे. साक्षदार क्र. ३ हा पंच साक्षदार असुन त्याने देखील कोणीतरी म्हशी तावाडे याच्या शेतात मारुन टाकल्याचे कथन केले आहे. सदर साक्षदाराचा पुरावा आरोपीविरुध्द दोषारोप शाबीत करण्यासाठी उपयुक्त नाही. साक्षदार क्र. ४ व ५ यांचा पुरावा देखील आरोपीचा गुन्हा शाबीत करण्यासाठी पुरेसा नाही. आरोपीने सदर जनावरांना करंट लावले व त्याने ते विहीरीत टाकले हे शाबीत करण्यासाठी अभिलेखावर विश्वासार्ह पुरावा नाही. अभिलेखावरील पुराव्यावरुन आरोपीविरूध्द लावण्यात आलेले गुन्हे संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत होत नसल्याने आरोपीला संशयाचा फायदा देवुन निर्दोष मुक्त करणे न्यायोचित होईल. म्हणुन मी मुद्दा क्रं. १ व २ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवुन मूद्दा क्रं. ३ साठी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी संजय श्रीपती सोयाम याला भारतीय दंड संहिताचे कलम ४२९ व २०१ अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ प्रमाणे रक्कम रु. १५,०००/- चा नविन जमानती बंधपत्र दयावे. सदर बंधपत्राची मुदत पुढील सहा महिण्यापर्यंत राहील. सदर कालावधीत आव्हान न झाल्यास बंधपत्र रद्द

होईल.

४. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

Digitally signed by YOGESHWAR VALVI
Date: 2026.07.27 18:09:54 +0530

दिनांक :-२७/०७/२०२६. {वाय.जे.वळवी}
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
चामोर्शी.